REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 11 | ISSUE - 5 | FEBRUARY - 2022

# निराधारांच्या आर्थिक सक्षमीकरणात निराधार योजनांचे योगदान– संदर्भ नागपूर जिल्हा

प्रा. विजय जानराव पाठक
संशोधनकर्ता, श्रीनिकेतन कला व वाणिज्य महाविद्यालय
रेशीमबाग, नागपूर

**सारांश:**




संजय गांधी निराधार योजनेअंतर्गत पात्र व्यक्तीला प्रतिमहा हजार रुपये व अपत्य असल्यास बाराशे रुपये आर्थिक साहाय्य देण्यात येते ही योजना अपंगातील अस्थिव्यंग, अंध, मूकबधिर, कर्णबधिर, मतिमंद इत्यादी प्रवर्गातील स्त्री-पुरुष, क्षयरोग, पक्षाघात, कर्करोग, कुष्ठरोग, सिकलसेल व सार्वजनिक आरोग्य विभागाने निश्चित केलेल्या दुर्धर आजारांसाठी लागू आहे तसेच दुर्धर आजारामुळे स्वतःचा चरितार्थ चालवू न शकणाऱ्या सर्व नागरिकांना, तृतीयपंथीयांना, निराधार, विधवा, घटस्फोटित, कमी पोटगी मिळणाऱ्या, महिला, परित्यक्त्या, देवदासी, अत्याचारित महिला, तसेच आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबातील अनाथ मुलांसोबत कोव्हिडमुळे वैधव्य आलेल्या महिलांनाही आता या योजनेचा लाभ मिळू शकतो करोनामुळे अनेक कुटुंबांतील कर्ता पुरुष गेल्याने त्या कुटुंबावर मोठे आर्थिक संकट कोसळले आर्थिक आधार नसलेल्या या कुटुंबातील विधवांना आर्थिक साहाय्य मिळावे, यासाठी अशा महिलांना संजय गांधी निराधार योजनेचा लाभ दिला जात आहे हा शोध पत्र नागपूर जिल्ह्यातील निराधार लोकांची आर्थिक स्थिती कशी आहे?, नागपूर जिल्ह्यातील निराधार लोकांची सामाजिक स्थिती कशी आहे? नागपूर जिल्ह्यातील निराधारांच्या आर्थिक सक्षमीकरणात निराधार योजनांचे काय योगदान आहे? तसेच निराधार योजनांचे लाभ घेताना निराधार लोकांना कोणत्या समस्या येतात? या प्रश्नांची उत्तरे शोधण्याच्या उद्देशाने लिहण्यात आला आहे.

**मुख्य शब्द:** आर्थिक साहाय्य, आर्थिक सक्षमीकर, नागपूर जिल्हा, निराधार योजना.

**संशोधनाची उद्दिष्टे:**

1) नागपूर जिल्ह्यातील निराधार लोकांच्या आर्थिक स्थितीचे अध्ययन करने
2) नागपूर जिल्ह्यातील निराधार लोकांच्या सामाजिक स्थितीचे अध्ययन करने
3) निराधार योजनांचे लाभ घेताना निराधार लोकांना कोणत्या समस्या येतातयाचे शोध घेणे.
4) नागपूर जिल्ह्यातील निराधारांच्या आर्थिक सक्षमीकरणात निराधार योजनांचे काय योगदान आहे याचे अध्ययन करने

**परिचय:**

अस्थिव्यंग व दुर्धर आजाराने अस्त, तसेच निराधार यासाठी राज्य शासनातर्फे संजय गांधी निराधार अनुदान योजना श्रवणबाळ सेवा राज्य निवृत्तिवेतन योजना आणि इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धकाळ निवृत्ती योजना अशा योजना राबविल्या जातात संजय गांधी निराधार

अनुदान योजनेतंर्गत 65 वर्षाखालील निराधार पुरुष व महिला, अनाथ मुले, अपंगातील सर्व प्रवर्ग, क्षयरोग, कर्करोग, एड्स, कुष्ठरोग यासारख्या आजारामुळे स्वत:चा चरितार्थ चालवू न शकणारे पुरुष व महिला, निराधार विधवा ( आत्महत्या केलेल्या शेतक-यांच्या विधवासह ), घटस्फोट प्रक्रीयेतील व घटस्फोट झालेल्या परंतु पोटगी न मिळालेल्या, अत्याचारित व वेश्या व्यवसायातून मुक्त केलेल्या महिला तृतीयपंथी, देवदासी,35 वर्षावरील अविवाहीत स्त्री, तुरूंगात शिक्षा भोगत असलेल्या कैद्यांची पत्नी, सिकलसेलग्रस्त या सर्वांना लाभ मिळतो. या योजनेमध्ये दारीद्रय रेषेखालील कुटुंबाच्या यादीत नाव असणे अथवा रुपये 21,000/- पर्यंत कौटुंबिक वार्षिक उत्पन्न असणे आवश्यक आहे. या योजनेखाली पात्र होणा-या कुटूंबात एक लाभार्थी असल्यास रुपये 600/- प्रतिमहा तर एका कुटूंबात एकापेक्षा जास्त लाभार्थी असल्यास, रुपये 900/- प्रतिमहा इतके आर्थिक सहाय्य दिले जाते. सर्वसाधारणपणे समाजातील निराधार व्यकती म्हणजे ज्या व्यकती स्वत:चा उदरनिर्वाह करु शकत नाहीत. उदा.अपंग,अनाथ,दुर्धर रोग ग्रस्त,विधवा स्त्रिया,एच.आय.व्ही ग्रस्त,अत्याचारीत महीला,वेश्याव्यवसायातून मुक्त केलेल्या महीला,35 वर्षावरील अविवाहीत महीला इ.लाभ देण्यात येतो. या योजनेअंतर्गत लाभार्थ्याची मुले 25 वर्षाची होईपर्यत किंवा नोकरी मिळेपर्यत (शासकीय/निमशासकीय/खाजगी) यामध्ये जे अगोदर घडेल तोपर्यत लाभार्थ्यांना लाभ देण्या येतो. लाभार्थ्यांना फक्त मुलीच असतील तर अशा लाभार्थ्याच्या बाबतीत मुलीचे वय 25 वर्षे झाले अथवा त्यांना नोकरी लागली किंवा त्यांचे लग्न होऊन त्या नांदावयास गेल्या तरी सुध्दा लाभ चालु राहील

निराधार महिला ६५ वर्षावर वृद्ध किंवा अस्थिव्यंग अंध, मूकबधिर मतिमंद वर्गातील महिला पुरुष, क्षयरो पक्षापात एचआयव्ही एड्स रो कुष्ठरोग असल्याने स्वतःचा चरितार्थ चालू शकण्यास असमर्थ असणारे शेतमजूर महिला तसे १८ वर्षाखालील अनाथ मुले अशा निराधारांसाठी शासनातर्फे ही योजना राबविली जाते. या योजनेत दर महिन्याला आपल्या खात्यात एक ठरावीक रक्कम जमा होते. समाजातील 65 वर्षे वयोगटाखालील वर नमूद केलेल्या प्रवर्गातील लाभार्थ्यास 600 /- प्रति महीना अर्थसहाय्य 65 वर्षे वयोमर्यादेपर्यत देय आहे.

इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंग निवृत्तीवेतन योजना यात दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाच्या यादीत नोंद असलेल्या अपंग लाभार्थ्यांपैकी फक्त 18 ते 65 वर्षाखालील वयोगटातील 80% हून जास्त अपंग असलेले किंवा एक किंवा एका पेक्षा जास्त अपंग असलेले किंवा बहू अपंग असलेले (दोन किंवा त्यापेक्षा जास्त अपंग असलेले) लाभार्थी इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंग निवृत्तीवेतन योजनेंतर्गत निवृत्तीवेतन मिळण्यास पात्र असतात. पात्र लाभार्थ्यांना केंद्र शासनाकडून रु.200/- प्रतीमहा व राज्य शासनाकडून संजय गांधी निराधार अनुदान योजनेंतर्गत रु.400/- प्रतीमहा असे एकूण रु.600/- प्रतीमहा निवृत्तीवेतन अनुज्ञेय आहे

श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन अनुदान योजना अंतर्गत राज्यातील65 व 65 वर्षावरील निराधार वृध्द व्यकतींना मासिक निवृत्तीवेतन देण्याच्या मूळ हेतूने श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना राबविण्यात येते.तेयासाठी 15 वर्षापासून महाराष्ट्र राज्याचा रहीवासी असणे आवश्यक. वय -65 व 65 वर्षापेक्षा अधिक,कुटूंबाचे नाव ग्रामीण/ शहरी भागाच्या द्रारीद्रय रेषेखालील कुटूंबाच्या यादीत समाविष्ट असावे किंवा कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न रुपये 21000 /- पर्यत असावे. राज्यातील 65 व 65 वर्षावरील द्रारीद्रयरेषेखालील कुटूंबाच्या यादीत नाव असलेल्या निराधार स्त्री व पुरषांना केंद्र शासनाच्या इंदीरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्तीवेतन योजनेमधून प्रतिमाह रुपये 200 /- निवृत्तीवेतन देण्यात येते.तसेच या योजनेस पुरक असलेल्या राज्य शासनाच्या श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेमधून प्रतिमाह रुपये 400/- इतके निवृत्तीवेतन देण्यात येते म्हणजेच प्रतिमा 600 इतके वेतन देय आहे. याला श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना गट 'अ' म्हणतात.

श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना गट ब ही योजना जे खरोखर गरजू निराधार वृध्द आहेत मात्र द्रारीद्रय रेषेखालील यादी मध्ये ज्यांची नोंद नाही व त्यांच्या कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न रुपये 21000 /- पर्यंत असेल तर अशा वृध्दांना संपूर्ण रुपये600 /- इतके श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना गट ब मधून देय आहे दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाच्या यादीत नोंद असलेल्या 40 ते 65 वर्षाखालील वयोगटातील विधवा, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन योजनेअंतर्गत निवृत्तीवेतन मिळण्यास पात्र असतात पात्र लाभार्थ्यांना केंद्र शासनाकडून रु.200/- प्रतीमहा व राज्य शासनाकडून संजय गांधी निराधार अनुदान योजनेअंतर्गत रु.400/- प्रतीमहा असे एकूण रु.600/- प्रतीमहा निवृत्तीवेतन अनुज्ञेय आहे.

## निराधारांच्या आर्थिक सक्षमीकरणात निराधार योजनांचे योगदान:

कोरोनामुळे अनेक कुटुंबांतील कर्ता पुरुष गेल्याने त्या कुटुंबावर मोठे आर्थिक संकट कोसळलेआर्थिक आधार नसलेल्या या कुटुंबातील विधवांना आर्थिक साहाय्य मिळावे, यासाठी अशा महिलांना संजय गांधीनिराधार योजनेचा लाभ दिला जात असून आतापर्यंत

544 महिलांचा या योजनेत समावेश करण्यात आला आहे. करोनामुळे एक पालक गमावलेल्या मुलांची संख्या1370 असून यापैकी 381 बालकांचे सामाजिक तपासणी अहवाल तयार करण्यात आले आहेत. उर्वरित बालकांच्या घरी जाऊन माहिती गोळा करण्याचे काम सुरू आहे.

ज्या बालकांचे आईवडील दोघेही करोनाने मृत्यू पावले, त्यांच्या मालमत्तेची नातेवाईक किंवा अन्य कोणीही विक्री करू नये म्हणून सहनिबंधक कार्यालयांना पत्र देण्यात येते. तसेच या बालकांच्या शाळेच्या शुल्काबाबत शिक्षण विभागालाही पत्र देण्यात येते दोन्ही पालक गमावलेल्या बालकांना लाभ देण्यात येणाऱ्या सर्व कायदेशीर अडचणी दूर करण्यासाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाने जलदगतीने कार्यवाही केली जाते.

संजय गांधी निराधार योजनेंतर्गत जिल्ह्यातील(शहर व ग्रामीण) 2 लाख निराधार महिलांना दरमहा अनुदान दिले जाते शहरातील लाभार्थ्यांची संख्या सुमारे 90 हजार आहे. यापैकी 15 हजारांहून अधिक लाभार्थ्यांची नावे लाभार्थी यादीतून वगळण्यात आली आहेत या लाभार्थ्यांच्या मुलांनी वयाची 25 वर्षे पूर्ण केल्याचा प्रशासनाचा दावा आहे. संजय गांधी निराधार योजनेंतर्गत निराधार विधवा, वृद्ध व अपंगांना दरमहा अनुदान दिले जाते विधवेला 1100 रुपये अनुदान आणि इतरांना1000-1000 रुपये मुले झाल्यावर त्यांच्या बँक खात्यात जमा केले जातात. सरकारने दिवाळीपूर्वी सर्व लाभार्थ्यांच्या खात्यावर अनुदान जमा करण्याचा केला होता दीपावलीनंतरही अनेक लाभार्थ्यांच्या खात्यात अनुदान जमा झाले नसताना पालकमंत्र्यांना लक्ष्य करण्यात आले. ज्या लाभार्थ्यांची मुले 25 वर्षांची झाली आहेत, त्यांचे अनुदान नियमानुसार बंद करण्यात आल्याचा प्रशासनाचा दावा आहे मूल 25 वर्षांचे झाल्यावर अनुदानाचा लाभ मिळत नाही. येथे अनुदान मिळत नसल्याच्या तक्रारी घेऊन लाभार्थी दररोज संजय गांधी निराधार योजना कार्यालयात पोहोचतात ज्यांचे अनुदान बंद झाले आहे, त्यांना मूल नाही किंवा मुलाचे वय 25 वर्षे झालेले नाही हे सांगावे लागेल. आधार कार्ड, रेशनकार्ड, बँक पासबुकची झेरॉक्स ऑफिसमध्ये जमा करता येते. लाभार्थीचा दावा खरा ठरल्यास प्रशासन पुन्हा अनुदान देऊ शकते मूल 25 वर्षांचे झाल्यावर अनुदान थांबते ज्या लाभार्थ्यांचे अनुदान बंद झाले, त्यांनी कागदपत्रे कार्यालयात सादर करावीत. तपासात लाभार्थी पूर्णपणे निराधार आहे, त्याला मुलगा नाही किंवा मुलाचे वय25 वर्षांपेक्षा कमी आहे, असे आढळून आल्यास अनुदान पुन्हा दिले जाते

कोरोना लॉकडाऊनच्या काळातही जिल्ह्यातील दिव्यांग लाभार्थ्यांच्या बँक खात्यात संजय गांधी निराधार योजनेची अनुदान रक्कम जमा करण्यात आली आहे. जिल्ह्यातील 13 हजार 287 लाभार्थ्यांच्या बँक खात्यात 2.66 कोटी रुपयांचा निधी जमा करण्यात आले होते. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत दिव्यांग व्यक्तीला संजय गांधी निराधार योजना व इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंग सेवानिवृत्ती वेतन योजनेचा लाभ दिला जातो. नागपूर शहरात 5095 तर ग्रामीण भागात 8192 लाभार्थी आहेत.

कोरोनामुळे लाभार्थ्यांना एकाच वेळी तीन महिन्यांचे अनुदान देण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे त्यामुळे जिल्ह्यातील लाभार्थ्यांच्या खात्यावर एकाच वेळी तीन महिन्यांचे अनुदान जमा झाल्याची माहिती ठाकरे यांनी दिली. त्यांना आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागू नये म्हणून शहरातील लाभार्थ्यांच्या खात्यावर तीन महिन्यांसाठी आणि ग्रामीण लाभार्थ्यांच्या बँक खात्यात मार्च व एप्रिल या दोन महिन्यांसाठी दरमहा 1000 रुपये अनुदान जमा करण्यात आले आहे राज्याची आर्थिक स्थिती नाजूक असतानाही या योजनेतील लाभार्थी, निराधार, वृद्ध, अंध, अपंग, विधवा, अत्याचारित महिला, घटस्फोटित महिलांना विभागामार्फत आर्थिक मदत दिली जाते.

**कोणत्या तालुक्यात किती लाभार्थी**

| **तालुका** | **लाभार्थी** | **तालुका** | **लाभार्थी** |
|---|---|---|---|
| नागपूर ग्रामीण | 13813 | हिंगणा | 14810 |
| कामठी | 17401 | कळमेश्वर | 13883 |
| काटोल | 20468 | कुही | 10267 |
| रामटेक | 13085 | मौदा | 10912 |
| सावनेर | 15958 | नरखेड | 16427 |
| उमरेड | 6966 | पारशिवनी | 12446 |
| भिवापूर | 8388 | नागपूर शहर | 64526 |

संजय गांधी योजना अंतर्गत महाराष्ट्रात वर्ष2013-14 मध्ये 747 लाख रुपये खर्च केले गेले यात32146 लाभार्थी होते. तर वर्ष 2014-15 मध्ये 914 लाख रुपये खर्च केले गेले यात 43603 लाभार्थी होते. इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंग निवृत्तीवेतन योजना या अंतर्गत महाराष्ट्रात वर्ष 2013-14 मध्ये 165 लाख रुपये खर्च केले गेले यात4985 लाभार्थी होते. तर वर्ष 2014-15 मध्ये 170 लाख रुपये खर्च केले गेले यात 5892 लाभार्थी होते.

श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना मध्ये 65 व 65 वर्षावरील व दारिद्रय रेषेखालील कुटुंबाच्या यादीत नाव समाविष्ट असणाऱ्याव्यक्तींना श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना गट (अ) मधून रु.400/- प्रतिमहिना निवृत्तीवेतन देण्यात येते. याच लाभार्थ्याला केंद्र शासनाच्या इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्तीवेतन योजनेचे रु200/- प्रतिमहा प्रति लाभार्थी निवृत्तीवेतन दिले जाते यामुळे या लाभार्थ्यांना राज्य शासनाकडून रु.400/- प्रतिमहा व केंद्र शासनाकडून रु.200/- प्रतिमहा असे एकूण रु.600/- प्रतिमहा प्रतिलाभार्थी निवृत्तीवेतन मिळते. गट (ब) अंतर्गत या योजनेतंर्गत ज्या व्यक्तीचे वय65 व 65 वर्षावरील आहे व ज्यांचे कुटुंबाचे एकूण वार्षिक उत्पन्न रुपये 21,000/- च्या आत आहे, अशा वृध्दांना श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना (गट- ब) मध्ये रुपये 600/- प्रतिमहा प्रतिलाभार्थी निवृत्तीवेतन राज्य शासनाकडून देण्यात येते

श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना अंतर्गत महाराष्ट्रात वर्ष2012-13 मध्ये 66122 लाख रुपये खर्च केले गेले यात 1354381 लाभार्थी होते. वर्ष 2013-14 मध्ये 90713 लाख रुपये खर्च केले गेले यात1526452 लाभार्थी होते. तर वर्ष 2014-15 मध्ये 98311 लाख रुपये खर्च केले गेले यात1860110 लाभार्थी होते. श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना योजनेचे शहरात 24 हजार 618 लाभार्थी आहेत. नागपूरचा विचार केला तर संजय गांधी निराधारव श्रावणबाळ योजनेअंतर्गत जिल्ह्यातील 2 लाख 6 हजार 629 ना डिसेंबर 2021 पर्यंत सर्व वाटप झाले आहे. एकूण 25 कोटी 66 लाख रुपयांचे अनुदान निराधारांच्या खात्यात जमा झाले आहे

सध्या संजय गांधी निराधार योजनेतील 63213 लाभार्थ्यांना सुमारे 17 कोटी 48 लाख 65 हजार रुपयाचे अनुदान बँक खात्यात जमा करण्यात आले आहे. विशेष साहाय्य योजनेंतर्गत संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ राज्य निवृत्ती वेतन योजना तसेच इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ निवृत्ती योजनांचा समावेश आहे या योजनेंतर्गत शहरातील 1 लाख 12 हजार 192 लाभार्थ्यांना अनुदान वितरित करण्यात येते. श्रावणबाळ राज्य निवृत्तिवेतन योजना अंतर्गत येणाऱ्या54828 लाभार्थ्यांना 59 लाख 62 हजार रुपये, इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धपकाळ निवृत्ती योजनेंतर्गत4151 लाभार्थ्यांना 72 लाख रुपयाचा निधी शासनाकडून प्राप्त झाला असून लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करण्याची कार्यवाही सुरु आहे.

## निराधार योजनांचे लाभ घेताना येणाऱ्या समस्या:

निराधार नागरिकांसाठी शासनाने संजय गांधी निराधार योजना सुरू केली असून त्यामध्ये गरीब, विधवा, निराधार, अपंग आणि ज्येष्ठ नागरिकांना दरमहा 1000 रुपये दिले जातात. हे लोक आर्थिकदृष्ट्या अत्यंत गरीब असून त्यांना कोणत्याही प्रकारचा आधार नाही मात्र नागपुरात असलेल्या संजय गांधी निराधार योजनेच्या कार्यालयाच्या वतीने या नागरिकांच्या कागदपत्रांमध्ये जाणीवपूर्वक चुका काढून त्यांना त्रास दिला जातो. त्याला आर्थिक मदत नाकारली जात असल्याचा आरोप लाभार्थी द्वारे लावले जात आहे.

नागपूर विधानसभा मतदारसंघातील श्रावणबाळ योजना व संजय गांधी निराधार अनुदान योजनेचे लाभार्थी गेल्या काही महिन्यांपासून अनुदानाच्या रकमेपासून वंचित आहेत. असेच वर्ष 2012 मध्ये घडले होते. राज्य सरकारकडून जिल्हा प्रशासनाला एक कोटीचे अनुदान मिळाले होते. या नंतर जिल्हा प्रशासनाने शहरातील चार विभागातील लाभार्थ्यांना अनुदान पाठविण्याची प्रक्रिया सुरू केली होती. विशेष म्हणजे प्रसार मध्यमानी निराधार योजना धोक्यात असल्याच्या बातम्या ठळकपणे प्रसिद्ध केल्या होत्या. यानंतर जिल्हा प्रशासनाने अनुदानासाठी धाव घेत सामाजिक न्याय विभागाशी संपर्क साधून स्मरणपत्रे पाठवली होती जिल्हा प्रशासनाकडून लाभार्थ्यांना वाटपासाठी एक कोटींचे अनुदान प्राप्त झाले होते. या नंतर संजय गांधी निराधार योजना कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी पश्चिम, उत्तर, दक्षिण आणि दक्षिण-पश्चिम भागातील लाभार्थ्यांच्या खात्यावर निधी पाठविण्याची प्रक्रिया सुरू केली होती. जिल्हा प्रशासन हा निधी बँकेच्या मुख्य शाखेत पाठविला होता व तो तेथून संबंधित लाभार्थ्यांच्या खात्यावर निधी जमा केला गेला होता वर्ष 2012 मध्ये शहरातील लाभार्थ्यांची संख्या 30 हजारांहून अधिक होती.

राज्य सरकार संपूर्ण शहरातील लाभार्थ्यांना अनुदान पाठवते, मात्र विभागातील कर्मचाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे सर्व विभागातील लाभार्थ्यांपर्यंत हे अनुदान तातडीने पोहोचत नाही. चारही विभागांची प्रक्रिया पूर्ण करून कर्मचारी मध्यपूर्वेतील लाभार्थ्यांना अनुदान वाटप सुरू करतात. त्यानंतरच मध्य आणि पूर्वेकडील लाभार्थ्यांना त्यांच्या खात्यातून निधी मिळते नवीन लाभार्थ्यांची संख्या पाचशेहून अधिक

आहे. कर्मचाऱ्यांनी हुशारीने काम केले असते तर आतापर्यंत सर्वलाभार्थ्यांना अनुदान मिळाले असते. कर्मचाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे लाभार्थ्यांना अनुदान वेळेवर मिळत नाही.

## निष्कर्ष:

आर्थिक सक्षम नसलेल्या ज्येष्ठांना या योजनांचा लाभ मिळवून दिला जातो संजय गांधी निराधार अनुदान या योजनेचा नेहमी गैरफायदा घेण्याचा प्रयत्न झाला आहे. समाजातील वृध्दांच्या बाबतीत काळजी घेण्याची समाजाची मानसिकता कायम राहावी म्हणून शासनाने आईवडील सांभाळ कायदा सन 2017 मध्ये देशभर लागू केला आहे असे लाभार्थी वृध्दापकाळ योजनेचा फायदा घेताना दिसून येत आहे. वृध्दापकाळ योजनेच्या लाभार्थ्यांना जन्मतारखांची तपासणी करणे आवश्यक आहे त्यामूळे खऱ्या लाभार्थ्यांना लाभ देणे महत्वाचे आहे. कोरोनामुळे उद्ध्वस्त झालेल्या कुटुंबातील विधवा महिला, अनाथ मुलांना विशेष सहाय्य योजनेतून अनुदान दिले जात आहे. इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ निवृत्ती वेतनयोजना, संजय गांधी निराधार अनुदान योजना, श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजनांचा लाभ ज्येष्ठांना होऊ लागला आहे

## संदर्भ ग्रंथ:


- दत्त आणि सुंदरम, भारतीय अर्थव्यवस्था, एस.चांद पब्लिकेशन, (2020)
- आहुजा राम, भारतातील सामाजिक समस्या, रावत प्रकाशन चौथी आवृत्ती, (2021)
- व्ही.के. पुरी, एस. के. मिश्रा, भारतीय अर्थव्यवस्था, हिमालय पब्लिकेशन,39 वा सुधारित (2021)
- W. Andrew Achenbaum, Social Security: Visions and Revisions: A Twentieth Century Fund Study, Cambridge University Press (1986)
- जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन जिल्हा नागपूर 2003, 2011, 2013,2020, 2021


## संकेतिक स्थळ:


- *https://mahades.maharashtra.gov.in/files/publication/Nagpur_2006_07.pdf*
- *https://des2.mahaonline.gov.in/files/publication/dsa_nagpur_2012.pdf*
- *https://nsdcindia.org/nsdcreports*
- *https://mahades.maharashtra.gov.in/esm.do?type=R*
- *https://mahades.maharashtra.gov.in/ESM1920/chapter/Marathi/esm2021_m.pdf*
- *https://mahades.maharashtra.gov.in/ESM1920/chapter/Marathi/ch1.pdf*
- *https://www.indiabudget.gov.in/economicsurvey/*
- *https://mumbaisuburban.gov.in/sanjay-gandhi-yojana/*
- *https://www.wikiprocedure.com/index.php/Nagpur_-_Apply_for_Financial_Assistance_for_Women,_Orphan_Children_and_Poor_through_Sanjay_Gandhi_Niradhar_Yojana_(Shravan_Bal_Yojana)*
- *https://india.unfpa.org/sites/default/files/pub-pdf/ThematicPaper1_2.pdf*
- *https://xn--i1bj3fqcyde.xn--11b7cb3a6a.xn--h2brj9c/my-government/schemes*
- *http://mrtba.org/sanjay-gandhi-niradhar-yojana/*